# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 28-11-2025

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कळमेश्वर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-11-28 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2025-11-29 | 2025-11-30 | 2025-12-01 | 2025-12-02 | 2025-12-03 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से) | 27.5 | 27.1 | 27.6 | 27.4 | 28.2 |
| किमान तापमान (अं.से) | 13.1 | 12.9 | 14 | 14.7 | 14.4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 56.9 | 56.5 | 56.9 | 63.1 | 61.6 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 20.2 | 24.7 | 25.1 | 27.8 | 26.8 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 9.4 | 7.5 | 8.2 | 6.7 | 5.7 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 22.6 | 16.7 | 15.3 | 15.5 | 341.6 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 5 | 5 | 3 | 1 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २९ नोव्हेंबर ते ०३ डिसेंबर २०२५ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २९ आणि ३० नोव्हेंबर व ०१, ०२ आणि ०३ डिसेंबर २०२५ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ४८ तासांत किमान तापमानात मोठा बदल होणार नाही, त्यानंतर पुढील २-३ अंश सेल्सिअसने वाढ होईल आणि विदर्भात पाच दिवसांत कमाल तापमानात मोठा बदल होणार नाही.

### कृषि सल्ला:

• परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. • ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | • हरभरा पिकास पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच फुलोरा अवस्थेत द्यावे. |
| गहू | • गहू बियाण्यास पेरणीपूर्वी ॲझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी. • गहू पिकामध्ये बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी गव्हाच्या बियाण्याला |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | बीजप्रक्रिया करावी, यासाठी शिफारस केलेले बुरशीनाशक आणि कीटकनाशके पुढीलप्रमाणे आहेत. बंट (Bunt), ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्बोक्सिन 75 % डब्ल्यूपी @ 2-2.5 ग्रॅम/किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी डायफेनोकोनाझोल ३ % डब्ल्यूएस @ २ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनाझोल ५.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एफएस @ ०.३ मिली प्रती किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्सिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डब्ल्यूएस @ ३ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा तांबेरा व काणी रोग तसेच वाळवी आणि मावा किडीच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १८.५ % + हेक्साकोनाझोल १.५ % एफएस @ ३ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीज प्रक्रिया करावी. • गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. बागायती उशिरा गहू पेरणीसाठी प्रती हेक्टरी १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. गहू पिकाच्या एचडी २१८९ किंवा पूर्णा यासारख्या जाड दाण्यांच्या वाणांसाठी बियाणे दर प्रती हेक्टरी १२५ किलो वापरावे. बागायती उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. बागायती वेळेवर आणि उशिरा या दोन्ही पेरणीसाठी नत्राची अर्धी मात्रा तसेच संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेली नत्राची अर्धी मात्रा पहिल्या पाण्याचे पाळीच्या वेळी (१८ ते २० दिवसानंतर) द्यावी. |
| भात | • परिपक्व झालेल्या धान पिकाची कापणी ही जमीनीलगत करावी जेणेकरुन खोडकिडीची सुप्तावस्था नष्ट होऊन उन्हाळी धान पिकात या किडीचा प्रादुर्भाव कमी होइल. • कापलेला धान पिक २ - ३ दिवस उन्हात वाळू द्यावे व वाळल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीस खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी. |
| कपाशी | • शेतकऱ्यांना कापसाची स्वच्छ वेचणी करण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. नंतरच्या पिकाच्या टप्प्यात कापूस लालसर होऊ नये म्हणून बोंड विकासाच्या टप्प्यात १% युरिया आणि १% मॅग्नेशियम सल्फेटची फवारणी करा. जर गुलाबी बोंडअळीने ETL (प्रति सापळा ५-८ पतंग प्रति रात्री सलग ३ रात्री किंवा ५-१०% हिरव्या बोंडांचा प्रादुर्भाव) केला तर फेनव्हॅलेरेट २० EC @ २०० मिली किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन ५EC @ २०० मिली किंवा सायपरमेथ्रिन १० EC @ २५० मिली किंवा सायपरमेथ्रिन २५ EC @ १०० मिली किंवा डेल्टामेथ्रिन २.८ EC @ २०० मिली किंवा अल्फामेथ्रिन १० EC @ १२० मिली किंवा फेनप्रोपॅथ्रिन १० EC @ ३०० मिली प्रति एकर फवारणी करावी. बुरशीजन्य पानांवरील डाग आणि बाहेरील बोंड कुजण्यापासून बचाव करण्यासाठी, अ‍ॅझोक्सीस्ट्रोबिन १८.२% + डायफेनोकोनाझोल ११.४% एससी @ १० मिली किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी @ १० मिली किंवा थायोफेनेट मिथाइल ७० डब्ल्यूपी @ २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ ४ ग्रॅम किंवा (कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी) @ २५ ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३ एससी @ १० मिली किंवा प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी @ २५ ग्रॅम किंवा (मेटिराम ५५% + पायराक्लोस्ट्रोबिन ५% डब्ल्यूजी) @ २० ग्रॅम किंवा (फ्लक्सापायरोक्साड १६७ ग्रॅम/लिटर + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/लिटर एससी) @ ६ मिली/१० लिटर पाण्यात मिसळून पानांवर फवारणी करा. कापसाच्या शेतात करड्या बुरशी आढळल्यास, त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी अ‍ॅझोक्सीस्ट्रोबिन १८.२% + डायफेनोकोनाझोल ११.४% एससी १० ग्रॅम/१० लिटर पाण्यात किंवा कार्बेन्डाझिम १२%+मँकोझेब ६३% डब्ल्यूपी २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| तूर | • तूर पिकाला कळ्या आणि फुले लागताच कीड व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्क अ‍ॅझाडीराक्टिन ३०० पीपीएम ५० मिली अधिक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या निरीक्षणासाठी हेक्टरी ५ फेरोमेन सापळे ५० मी. अंतरावर लावावे. • तूर पिकामध्ये शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५० % एससी १५० मिली प्रती ५०० ते ७५० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा इमॅमेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी @ २२० ग्राम प्रती ५०० ते ७५० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा इथिओन ५० % ईसी @ १००० ते १५०० मिली प्रती ५०० ते १००० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा फ्लुबेंडियामाइड २० % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा फ्लुबेंडियामाइड ३९.३५ % m/m एससी @ १०० मिली प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०५ % ईसी @ ४००-५०० मिली प्रती ४००-६०० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा क्विनालफॉस २५ % ईसी @ १४०० मिली प्रती ५००-१००० लिटर पाणी प्रती हेक्टर किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या पैकी वरील कोणत्याही एका शिफारशीत असलेल्या किटक नाशकाची आवश्यक पाण्यत मिसळून फवारणी करावी. |
| मोहरी | • वाफसा अवस्थेत मोहरी पिकामध्ये पेरनीनंतर २० व ४० दिवसा नंतर २ निंदन व २ डवरणी करावी. |
| घोडा घास | • बरसीम हे चारा पिक थंड व उबदार हवामान असल्यास फायदेशीर ठरते. बरसीम पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. जमीन नांगरणी करून त्यानंतर दोन कुळवाच्या दोन आडव्या उभ्या पाळ्या देऊन जमीन सपाट करावी तसेच कडी कचरा वेचून जमीन स्वच्छ करावी. लागवडीसाठी मेसकावी, वरदान, जे बी ०१, बीएल ०१, ज एच बी- १४६ सुधारित वाणाची निवड करावी. पिकाच्या आवश्यक वाढीसाठी लागणारी थंडी मिळण्यासाठी पेरणी नोव्हेंबर अखेर |

| पिक | पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| | पर्यंत करावी. पेरणीसाठी ०५ x ०३ मीटर आकाराचे सपाट वाफे तयार करावेत. ३० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात दोन ओळीतील अंतर ३० सेंमी ठेऊन किंवा सपाट वाफ्यावर बियाणे फेऊन पेरणी करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास शिफारशीतील बीज प्रक्रिया करावी. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी उपलब्धतेनुसार १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी २० किलो नत्र, ८० किलो स्फुरद व ४० किलो स्फुरद या रासायनिक खताची मात्रा द्यावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| कांदा | • गादीवाफ्यावर कांदा बियाणे हेक्टरी ८ ते १० किलो पेरावे. कांदा लागवडीसाठी पांढऱ्या कांद्याच्या जाती: अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता आणि पुसा व्हाईट राउंड व लाल कांद्याच्या जाती: पुसा रेड, एन २-४-१, निफाड-५३ आणि बसवंत ७८० या वाणाची निवड करावी. |
| संत्रा | • या महिन्यात (मृग बहार – जुन फुलोरा) नागपुरी संत्रा व मोसंबी च्या झाडांना ठिबक किंवा दुहेरी आळे पद्धतीने ओलीत करावे. संत्रा व मोसंबीच्या एक वर्ष पर्यंतच्या झ्डांना ८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ४ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ३६ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ८ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस आणि १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना १०५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. लिम्बुच्या १ वर्ष वयाच्या झाडांना ४ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस तर १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. आंबिया बहराच्या फळ काढणीस उशीर होत असल्यास १५ दिवसाच्या अंतराने जिबरेलिक आम्ल १५ पीपीएम + १ % युरिया याची दोनदा फवारणी करावी. तन व्यवस्थापन करून बाग स्वच्छ ठेवावी. झाडाच्या बुन्ध्याजावालाची जमीन भुसभुशीत करावी. एक वर्ष वयाच्या झाडांना १०८ ग्राम युरिया आणि ४५ ग्राम म्युरेट ऑफ पोटाश द्यावे. दोन वर्ष वयाच्या झाडांना दुप्पट, तीन वर्ष वयाच्या झाडांना तिप्पट तर चार वर्ष वयाच्या झाडांना चौपट खताची मात्रा द्यावी. खते देतांना नेहमी जमीन हि वाफसा अवस्थेत असल्याची काळजी घ्यावी जेणेकरून पिकास दिलेल्या खताची बचत होईल. बहार असलेल्या फळ बागेतील झाडांना ५०० ग्राम युरिया, ६०० ग्राम सिंगल सुपर फॉस्फेट, १५० ग्राम म्युरेट ऑफ पोटाश, १०० ग्राम फेरस सल्फेट, १०० ग्राम मँगनीज सल्फेट, १०० ग्राम झिंक सल्फेट आणि ५० ग्राम बोराक्स प्रत्येक झाडांना द्यावे. |
| वांगे | • वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवा डेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवा स्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवा थियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
| --- | --- |
| गाय | • जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
| --- | --- |
| सामान्य सल्ला | • रोपवाटीकेतील वांगी, टोमाटो, फुलकोबी व पानकोबीचे ४ ते ६ आठवडे वयाची रोपांची शेतात लागवड करावी. मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर याची टप्प्याटप्प्याने लागवड करावी. |